प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय /शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा <u>(गट-ब) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत..</u>

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एससीटी- ६५१३/प्र.क्र (१५/१३)/(भाग-१)/तांशि-१,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -: ०६ मार्च, २०१८

<u>संदर्भ:-</u>
१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(२)(१७२)/१३१३०/सात-अ, दि. २७/११/२०१५
२) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२ दि.२८/४/२०१५
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एससीटी- ६५१३/(१५/१३)/तांशि-१, दि. २७/७/२०१६
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एससीटी-६५१३/(१५/१३)/तांशि-१, दि.२१/११/२०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा (गट-ब) या पदावर नियुक्तीसाठी एकूण २६ उमेदवारांची शिफारस करण्यात आली होती. त्यापैकी, संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयांन्वये अनुक्रमे ८ व १२ अशा एकूण २० उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. उर्वरित उमेदवारांपैकी २ उमेदवारांचा अनुभव उक्त पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरीतीतील तरतुदीनुसार शासकीय कार्यालयातील आहे, याबाबत खात्री करुन त्यांच्या नियुक्तीविषयी निर्णय घ्यावा; अशी सूचना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केली होती. त्यानुसार संबंधित उमेदवारांचा अनुभव शासकीय कार्यालयातील असल्याबाबत खात्री करण्यात आली असून, संबंधित २ उमेदवारांना नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत खालील उमेदवारांची प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा (गट-ब) या पदावर खालील विवरणानुसार त्यांच्या नावांसमोर दर्शविण्यात आलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी, ते ज्या दिनांकांपासून सदर पदाचा पदभार स्वीकृत करतील त्या दिनांकांपासून, दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (रु. ९३००-३४८००/- अधिक ग्रेड पे रू. ४४००/- या वेतनश्रेणीत) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. सदर उमेदवारांची नियुक्ती, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/

कार्या.१२, दि. २८ एप्रिल, २०१५ नुसार विहित करण्यात आलेल्या “महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने / पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम- २०१५” नियमानुसार करण्यात येत आहे.

अ. क्र	उमेदवाराचे नाव	गु.क्र	वर्गवारी	आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग	नियमानुसार वाटप करण्यात आलेला महसूली विभाग	नियुक्तीचे ठिकाण
१	श्री. सिडाम नितेश मधुकर	१६	अ.ज.	अ.ज. (अनुशेष-१)	औरंगाबाद	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
२	श्री. मडावी धिरजशहा मुरारी	२२	अ.ज.	अ.ज.-१	औरंगाबाद	शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

२. **वरील प्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती ही दोन वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करण्याच्या व खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:-**

१) उपरोक्त नमूद उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू व्हावे अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. उमेदवारांनी त्यांचा रुजू अहवाल संबंधित संस्था प्रमुखांकडे सादर करावा.

२) एखाद्या उमेदवारास विहीत कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास संबंधिताने सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. विहित कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणा-या उमेदवारांना मुदतवाढ देण्यासंदर्भात अंतिम निर्णय शासनाचा राहील.

३) वरील उमेदवारांनी हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा सदर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर यासंबंधी असलेल्या नियमानुसार भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ प्रचलित नियमानुसार रोखून ठेवण्यात येईल.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२०००/३९, दि. ०७.०८.२००१ अन्वये शासन सवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२०००/३९, दि. १९.०३.२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक

आहे. जर त्यांनी विहित मुदतीत प्रमाणपत्र उपलबध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांच्या सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दि. १८.०८.२००९ मधील तरतूदीनुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचा-याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर कार्यरत अर्ज केला असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. सदर अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचा-यास नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू ठरतील.

६) सदर उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाची नसल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल अथवा सेवेतून कमी करण्यास ते पात्र ठरतील.

७) संबंधित प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/शासकीय तंत्रनिकेतन, यांनी वरील उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्तीबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवि -२७१५ / प्र.क्र.३०२/ आठ, दि. २९/०२/२०१६ मधील नमूद केलेल्या तरतुदीनुसार विहीत कालावधीत संचालक, तंत्रशिक्षण यांचेमार्फत शासनास पाठवावा.

सदर उमेदवारांना पहिली वेतनवाढ परिविक्षाधीन कालावधीतील एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर देण्यात यावी व दुसरी वेतनवाढ परिविक्षाधीन कालावधी समाप्त झाल्याचे आदेश निर्गमित करण्यात आल्यानंतर देण्यात यावी.

८) उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतूदीनुसार निश्चित करण्यात यावे. तथापि, सदर नियुक्ती स्वीकारण्यापूर्वी जे उमेदवार शासन सेवेत कार्यरत असतील त्यांची वेतननिश्चिती वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१२८९/ प्र.क्र.२/ ९०/सेवा-३, दि.२३ मार्च, १९९४ अन्वये विहीत करण्यात आलेल्या अटींनुसार करण्यात यावी.

९) सदर नियुक्ती उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे नियुक्तीनंतर खोटी अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१०) सदर उमेदवारांचे सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

११) वरीलपैकी ज्या उमेदवारास सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल, त्यास शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.०२/१२/१९९७ मधील तरतुदीनुसार शासनाला किमान एक महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. मात्र गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इ. कारणांसाठी

एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरीलप्रमाणे नोटीशीचे बंधन शासनावर असणार नाही.

१२) वरील उमेदवारांचे वैद्यकीय तपासणी अहवाल व चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत. त्याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

१३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपरोक्त उमेदवारांची शिफारस पूर्वीच्या सेवेतील गोपनीय अहवाल तपासणीच्या अधीन राहून केली आहे. तथापि, या उमेदवारांचे गोपनीय अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहेत. उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती पूर्वीच्या शासकीय सेवेतील गोपनीय अहवाल तपासण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१४) वरील उमेदवारांना अनुज्ञेय वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील. उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देण्यात येणार नाही.

१५) विशिष्ट ठिकाणी पदस्थापना / बदली / नियुक्ती मिळविण्यासाठी खासदार / आमदार /लोकप्रतिनिधी / खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचेमार्फत दडपण अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१२३४२१६८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sameer Laxman Dhere

Digitally signed by Sameer Laxman Dhere
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6ab4a357b0e2247b4328b57f45f509bf1bf0bd20c865128a018421c354bddc5, serialNumber=6ee64cf9b42881125c3715a5db341b5827c5743c728bc85f04bb71ff8fc154d6, cn=Sameer Laxman Dhere
Date: 2018.03.06 12:36:10 +05'30'

(समीर ढेरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्री. सिडाम नितेश मधुकर,प्लॉट नं ५०६,सहयोग नगर, नारी रोड,पॉवर ग्रीडच्या पाठीमागे, नागपूर-४४० ०२६ (नोंदणीकृत देय डाकेने)

२) श्री. मडावी धिरजशहा मुरारी, मातावार्ड, नैनपूर रोड, मु.पो. व तालुका- देसाईगंज जि.गडचिरोली-४४१ २०७ (नोंदणीकृत देय डाकेने)

प्रत,

१. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे).

३. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
५. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद/शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड-

त्यांना कळविण्यात येते की, वरील उमेदवारांस रुजू करुन घेताना त्यांच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करावी व सदर उमेदवारांचे पूर्वीच्या शासकीय सेवेतील गोपनीय अहवाल तपासून ते पात्र असल्याची संस्थाप्रमुखांनी स्वत: खात्री करावी व उमेदवारास हजर करुन घेऊन त्याबाबतचा रुजू अहवाल, संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.

६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२ मुंबई/ नागपूर.
७. अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद/नांदेड
९. निवड नस्ती (तांशि-१).